**तकार (यु.एल.पी.) क.२२/२०२१.**
**नि.क.यु.डब्ल्यु—०१.**

**पुढील सरतपासणी तकारदारातर्फे श्री.व्ही आर देशपांडे वकील यांचेमार्फत शपथेवर सुरु.**

प्रस्तुत प्रतिज्ञापत्र मी दाखल केले असून ते वाचले आहे व त्यात लिहिलेला संपूर्ण मजकूर माझे माहिती व समजूतीप्रमाणे खरा व बरोबर असून त्याखाली मी माझी सही केली आहे.

तक्रार अर्ज क्र.४८/२०१० मधील न्यायनिर्णयाची सत्यप्रत **नि.क्र.यू.८** वर आहे. किरकोळ अर्ज यूएलपी क्र.०६/२०१४ मधील न्यायनिर्णयाची सत्यप्रत **नि.क.यू.९** वर आहे. रिव्हीजन अर्ज यूएलपी क्र.५८/२०१३ मधील न्यायनिर्णयाची सत्यप्रत **नि.क्र.यू.१०** वर आहे. मी सामनेवालाकडे दि.२९/०५/२०१४ रोजी दिलेल्या पत्राची स्थळप्रत **नि.क.यू.११** वर आहे. सामनेवालाने दिलेला आस्थापना आदेश क्र.९८६३/२०१५ **नि.क.यू.१२** वर आहे. मी सामनेवालाकडे लिहून दिलेल्या हमीपत्राची प्रत **नि.क.यू.१३** वर आहे. सामनेवालाने मला दि. १४/०८/२०१५ रोजी दिलेले प्रत **नि.क.यू.१४** वर आहे. सामनेवालाने श्री.चंदनशिवे कर्मचारी यांची व माझी दिलेली पे—स्लिप **नि.क.यू.१५/१ व यू.१५/२** वर आहे.

**उलटतपास सामनेवालातर्फे श्री.आर व्ही दामले वकील यांचेमार्फत सुरु.**

१. हे खरे की न्यायालयाने आधीच्या प्रकरणात न्यायनिर्णय दिल्यानंतर आपसात तडजोड करावी यासाठी मी सामनेवालाच्या मुंबई कार्यालयास सामनेवालाच्या सोलापूर कार्यालयामार्फत पत्र दिले होते. हे खरे की मला कामावर घेतले त्यावेळी मी सामनेवालाच्या हक्कात हमीपत्र लिहून दिले आहे. हे खरे की मी दिलेला तडजोडीचा अर्ज व हमीपत्र याआधारे सामनेवालाने दि.२१/०८/२०१५ रोजी कामावर रोजंदारी कर्मचारी म्हणून रुजू करुन घेतले. हे खरे की त्या संदर्भात मला रुजू करुन घेण्यासाठी दिलेला आदेश मी अभिलेखावर दाखल केलेला नाही. हे खरे की सामनेवालाने त्या संदर्भात दिलेला आदेश स्विकारुन मी त्यानुसार कामावर रुजू झालो. हे म्हणणे खरे नाही की प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल करण्याआधी देण्यात आलेल्या त्या रुजू आदेशाबददल मी कधीही आक्षेप घेतला नव्हता. तसा आक्षेप मी कधी व कोणाकडे घेतला होता ते मला आज सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी प्रस्तुतचा तक्रार अर्ज दाखल करण्याआधी तसा आक्षेप कधीही घेतला नव्हता व आक्षेप घेतला होता हे खोटे सांगत आहे.

२. (यावेळी सामनेवालाच्या विद्वान वकीलांनी यादी नि.क्र.सी.६ सोबत मूळ हमीपत्र दाखल करुन ते साक्षीदारास दाखविण्याची परवानगी मागितली. साक्षीदाराने त्या हमीपत्राची प्रत आधीच

दाखल केली असल्याने परवानगी देण्यात आली.) आता मला दि.१३/०७/२०१५ रोजी मी करुन दिलेले मूळ हमीपत्र दाखविण्यात आले. हे खरे की ते हमीपत्र मी नोटरी यांचेसमोर तयार करुन सामनेवालाकडे सादर केले. त्या हमीपत्रास **नि.क.सी.६** देण्यात आली. हे म्हणणे खरे नाही की अचानकपणे दबावाने ते हमीपत्र माझेकडून लिहून घेतले असे खोटेपणाने नमूद करुन मी २०२१ साली प्रस्तुतचा खोटा तक्रार अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की ते हमीपत्र माझेवर दबाव आणून लिहून घेतल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की नंतर सुचलेल्या खोटया कारणांवरुन प्रस्तुतचा खोटा तक्रार अर्ज मी दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रार अर्जास विलंबाची बाधा येवू नये या उददेशाने तसे खोटे कारण पुढे करुन मी तक्रार अर्ज दाखल केला आहे. हे म्हणणे खरे नाही की तक्रार अर्ज व प्रतिज्ञापत्रातील सामनेवाला विरुध्दचा संपूर्ण मजकूर खोटा व चुकीचा आहे.

**उलटतपासणी पूर्ण**

**फेरतपास काही नाही.**

**श्रवणोत्तर स्विकृत** ४

PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Digitally signed by PRASHANT PRABHAKAR RAJVAIDYA
Date: 2023.09.15 13:05:34 +0530

( प्र. प्र. राजवैद्य )
सदस्य,
औद्योगिक न्यायालय, सोलापूर.

सोलापूर.
दिनांक :– १५/०९/२०२३.
*माकम/–*